पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
CorelDRAW Ps Ai Id
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

काजळे ज्वेलर्स
Diamond Jewellery Launching
(Coming Soon)
Vacancy for 4 Sales Officers
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777

वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक १०७ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार । ०५/०५/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

## भाजप किंग, ममतांचा पराभव, थलपतींची जादू, डावे भुईसपाट, काँग्रेसला उभारी

# पश्चिम बंगाल, आसाम, पुद्दुचेरीत कमळ फुलले



| पश्चिम बंगाल | तामिळनाडू | केरळ | आसाम | पुद्देचेरी |
|---|---|---|---|---|
| एकुण जागा- २९३ | एकुण जागा- २३४ | एकुण जागा- १४० | एकुण जागा- १२६ | एकुण जागा- ३० |
| बहुमतासाठी -१४६ | बहुमतासाठी - ११८ | बहुमतासाठी - ७१ | बहुमतासाठी - ६४ | बहुमतासाठी - १६ |
| २०२६: भाजप- १९५, टीएमसी -९१, काँग्रेस -२, डावे - १, इतर -४ | २०२६: टीव्हीके - ११०, एडीएमके - ६३, डीएमके - ६१, इतर - ० | २०२६: काँग्रेस+ - १००, डावे - ३७, भाजप - ०३, इतर - ० | २०२६: भाजप - ९७, काँग्रेस - २७, एआययुडीएफ - ०३, इतर - १ | २०२६: भाजप+ - २०, काँग्रेस+ - ७, इतर - ३ |
| २०२१: टीएमसी सत्ता (२१३) | २०२१: डीएमके सत्ता (१३३) | २०२१: डावे सत्ता (६२) | २०२१: भाजप सत्ता (६०) | २०२१: भाजप+ सत्ता (१६) |
| सत्ता परिवर्तन भाजप विजयी | सत्ता परिवर्तन टीव्हीके + विजयी | सत्ता परिवर्तन काँग्रेस + विजयी | भाजपची पुन्हा सत्ता | भाजपची सत्ता कायम |


नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

देशातील पाच राज्यांत आणि महाराष्ट्रात दोन ठिकाणी विधानसभेची पोटनिवडणूक झाली. या पाच राज्यांपैकी तीन राज्यात सत्तापरिवर्तन होणार असून सर्वात धक्कादायक म्हणजे तामिळनाडूमध्ये अवघ्या दोन वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या अभिनेते विजय थलपती यांच्या टिव्हिके पक्षाने जोरदार मुसंडी मारत सत्तेकडे वाटचाल सुरू केली आहे. त्यामुळे डिएमकेला व मुख्यमंत्री स्टॅलिन यांना मोठा धक्का बसला आहे. तर दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजपसाठी आणि ममता बॅनर्जी यांनी तृणमूल काँग्रेससाठी अतिशय प्रतिष्ठेची केलेल्या पश्चिम बंगाल निवडणूकीत भाजपने तृणमूल काँग्रेसला जोरदार धक्का देत सत्ता काबीज करण्याकडे झेप घेतली आहे. या ठिकाणी पहिल्यांदाच सत्ता स्थापनेचे स्वप्न भाजप पूर्ण करणार असे स्पष्ट दिसत आहे. ममता बॅनर्जी यांचे चौथ्यांदा सत्ता स्थापन करण्याचे स्वप्न भंग पावणार आहे तर आसाम आणि पोद्दुचेरीमध्ये भाजपने आपली सत्ता कायम राखली आहे. केरळमध्ये काँग्रेसने डाव्यांना धोबीपछाड देत सत्ता हस्तगत केली आहे.




एकुणच या निवडणुकीत भाजपने पाच पैकी तीन राज्यात ऐतिहासिक कामगिरी करत कट्टर विरोधक ममतांच्या राजकारणाला ब्रेक लावला आहे. काँग्रेसने एकमेव सत्ताकेंद्र राहिलेल्या डाव्यांचे राजकारण थांबवले आहे तर थलपती यांच्या रुपाने नव्या राजकीय नेत्याचा उदय राजकारणात झाला आहे.

जवळपास संपूर्ण देशात भाजपची सत्ता असताना विरोधातील एकांड्या शिलेदाराप्रमाणे भाजपला आजपर्यंत शरण न गेलेल्या पश्चिम बंगालमध्ये सत्तांतर होणार आहे. पश्चिम बंगालमध्ये गेली १५ वर्षे ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसचे सरकार होते. देशातील अनेक राज्यं भाजपच्या ताब्यात जात असताना ममता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालचा गड टिकवून ठेवला होता. मात्र सोमवारी जाहीर झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या निकालावरुन आता याठिकाणी भाजप सत्ता स्थापन करणार आहे. पश्चिम बंगालमध्ये बहुमतासाठी १४८ जागांची गरज आहे. मतमोजणीच्या सध्याच्या कलानुसार १९३ जागांवर आघाडी घेतली आहे. तर सत्ताधारी तृणमूल अवघ्या ९३ ठिकाणी आघाडीवर आहे. भाजपसाठी हे ऐतिहासिक यश मानले जात आहे. यापूर्वी २०१६ आणि २०२१ या दोन्ही विधानसभा निवडणुकांमध्ये पश्चिम बंगालची सत्ता हस्तगत करण्यासाठी भाजपने सर्व ताकद पणाला लावली होती. मात्र या दोन्ही निवडणुकांमध्ये तितक्याच इर्ष्येने लढून ममता बॅनर्जी यांनी भाजपची डाळ शिजू दिली नव्हती. मात्र, यंदा भाजपने कोणत्याही परिस्थितीत पश्चिम बंगाल काबीज करायचाच, असा चंग बांधला होता. त्यासाठी गेल्या काही महिन्यांपासून अमित शाह हे पश्चिम बंगालमध्ये स्वत: सूत्रं हलवत होते. पश्चिम बंगाल निवडणुकीचा प्रचार आणि मतदान या काळात अमित शाह हे अक्षरश: पश्चिम बंगालमध्ये तळ ठोकून बसले होते. पहिल्या टप्प्यातील मतदानानंतर अमित शाह यांनी पश्चिम बंगालमध्ये भाजपच्या मोठ्या विजयाचे भाकीत केले होते. या निवडणुकीसाठी भाजपने आपली संपूर्ण यंत्रणा पश्चिम बंगालमध्ये उतरवली होती. या निवडणुकीच्या मतदानावेळी तब्बल दोन लाख सीआरपीएफ जवान आणि कडेकोट बंदोबस्त पश्चिम बंगालमध्ये तैनात करण्यात आला होता. तसेच या निवडणुकीपूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगाने एसआयआर मोहीमेतंर्गत जवळपास ९० लाख मतदारांची नावे निवडणूक यादीतून काढून टाकली होती. ही गोष्ट पश्चिम बंगालच्या निवडणुकीत निर्णायक ठरल्याचे दिसत आहे. केरळमध्ये १० वर्षांनतर यश मिळाल्याने काँग्रेसला संजिवनी मिळाली आहे. तामिळनाडूत काँग्रेस टिव्हीकेला पाठिंबा देण्याची शक्यता आहे. ममता बॅनर्जी यांच्या पराभवामुळे इंडिया आघाडीतील त्यांचे वर्चस्व कमी होण्याची शक्यता आहे.




## सुनेत्रा पवार, अक्षय कर्डिले विक्रमी मतांनी विजयी



राहुरी/बारामती (वृत्तसंस्था)

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर बारामतीत आणि भाजपचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानंतर राहुरी विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुक पार पडली. या दोन्ही ठिकाणची मतमोजणी आज सोमवारी पार पडली. दोन्ही ठिकाणी बिनविरोध निवडणूक व्हावी, यासाठी जोरदार प्रयत्न करण्यात आले. मात्र अपक्षांमुळे या दोन्ही ठिकाणी निवडणूक घ्यावी लागली.

सुनेत्रा पवारांनी यांनी अजित दादांचा २०२४ मधील विक्रम मोडला आहे. तेराव्या फेरीनंतर सुनेत्रा पवार यांना एकूण १ लाख १२ हजार २६८ मतं मिळाली असून तेराव्या फेरीत सुनेत्रा पवार यांना ८५६९ मतं मिळाली आहेत. त्यामुळे सुनेत्रा पवारांनी अजित पवारांचा २०२४ मधील विक्रम मोडला आहे. २०२४ मध्ये अजित पवारांचा १ लाख १ हजारांनी विजय झाला होता. तर सुनेत्रा पवार या मतदार संघातून जवळपास दोन लाखांच्या आसपास मतांनी विजयी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या २२ व्या फेरीअखेर निकालाचे चित्र आता स्पष्ट झाले असून, भाजपचे अक्षय कर्डिले यांनी १ लाखाच्या मताधिक्क्याचा टप्पा पार केला आहे. या फेरीअखेर कर्डिले यांनी ८६ हजारांहून अधिक मतांची आघाडी घेतली आहे. अक्षय कर्डिले यांना एकूण १,०९,७१२ मते मिळाली असून, त्यांनी ८६,२५३ मतांची आघाडी घेतली आहे. शरद पवार गटाचे गोविंद मोकाटे यांना अवघ्या २३,४५९ मतांवर समाधान मानावे लागले आहे.

## प्रवरेत प्रचंड नदी प्रदूषण, अधिकारी झोपेत - जाखडी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- 'संगमनेर मधील सर्वच नद्यांच्या पात्रात आणि प्रवाहात मानवी जीवनाला हानिकारक अश्या घातक कचऱ्यामुळे प्रचंड प्रदूषण होत असून सरकारी अधिकारी मात्र ढाराढूर झोपेत आहेत. कर्तव्यात कसूर करीत असल्याबद्दल या सर्व अधिकाऱ्यांवर देखील कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. नदी म्हणजे नागरिकांच्या जीवनवाहिनी असून त्यात घाण टाकणारे आरोपी जर अधिकारी वर्गाला सापडत नसतील तर त्यांचे वेतन थांबविण्यात यावे' अशी मागणी संगमनेर पुरोहित प्रतिष्ठानचे अध्यक्ष भाऊ जाखडी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

संगमनेर शहराच्या हद्दीतून प्रवरा, म्हाळुंगी, म्हानुटी या नद्या तसेच नाटकी नाला वाहतात. संगमनेर शहराच्या वैभवशाली इतिहासात प्रवरा म्हाळुंगी संगमामुळेच या शहराला संगमनेर नाव मिळाल्याचे सर्वत्र नमूद आहे. मात्र आज या संगमाच्याच पवित्र स्थळी आरोग्याला घातक परिस्थिती निर्माण झालेली आहे. ज्याला वाटेल तो कोणताही पुढचा मागचा विचार ना करता तेथे हर प्रकारचा कचरा आणून टाकतो. बांधकामांचे वाया गेलेले साहित्य येथे शेकडो वाहनातून आणून टाकले जाते. त्यामुळे सर्वत्र अस्वच्छता दुर्गंधी आणि रोगप्रसार करणारे जीवजंतू, कीटक, डास, अळ्या यांचा प्रादुर्भाव होत आहे. हीच परिस्थिती म्हानुटी आणि नाटकी नाल्याची आहे.

एकीकडे देशाचे पंतप्रधान आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री जलप्रदूषण रोखण्यासाठी अनेक योजना राबवीत आहेत. मात्र संगमनेर शहरातील नगरपालिकेचे तसेच महसूल खात्यातील अधिकारी नदी संरक्षणाचे तीन तेरा वाजवीत आहेत. वाळू चोरांना येथील शासकीय कार्यालये म्हणजे हक्काची आश्रयस्थाने वाटत आहेत का?? तेथे अभयारण्यात वावरावे तसे हे वाळू तस्कर वावरत असतात. या सर्वांशी अधिकारी हातमिळवणी करून आहेत का ?? याने निसर्गाचे मात्र जबरदस्त नुकसान होत आहे. कोरडी असताना देखील नद्यांची पात्रे आणि वाहात असताना प्रवाह देखील प्रदूषित करणारी विकृत माणसे म्हणजे मानवतेचे गुन्हेगार असून त्यांच्यामुळे सर्वांच्या जीवाला उत्पन्न होणारा धोका लक्षात घेऊन बेजाबदार वर्तन करून डोळेझाक करणारे अधिकारी देखील तितकेच गुन्हेगार असल्याने त्यांना देखील राज्य सरकारने कायद्याचा बडगा उगारून वठणीवर आणावे अशी मागणी पत्रकात श्री जाखडी यांनी शेवटी केली आहे.

## अखेर पंढरपूर कॉरिडॉरला मंजुरी

मुंबई (वृत्तसंस्था)

पंढरपूर कॉरिडॉर आणि विकास आराखड्यासंदर्भात झालेल्या मुंबईत मंत्रिमंडळ शिखर समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पालकमंत्री जयकुमार गोरे, वनमंत्री गणेश नाईक, आमदार समाधान आवताडे यांच्यासह महसूल आणि जलसंपदा विभागाचे सचिव, जिल्हाधिकारी व इतर अधिकारी उपस्थित या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीत १ ऑगस्टपर्यंत भूसंपादन आणि बाकीची प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या असल्याचे आमदार समाधान आवताडे यांनी सांगितले. विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर दौऱ्यातच पंढरपूर विकास आराखडा आणि कॉरिडॉर संदर्भात भूमिका स्पष्ट केली होती. त्यानंतर, आता मंजुरी देण्यात आली आहे.

पंढरपूर देवस्थान विकास आराखडा आणि कॉरिडॉरसाठी साधारण ४००० कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला असून या आराखड्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील शिखर समितीने मंजुरी दिली. पंढरपूरला पुढील ५० वर्षात येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेऊन पंढरपूरसाठी मंदिर परिसरात कॉरिडॉर आणि शहरात विकास आराखडा तयार करण्यात आलेला आहे. जवळपास ४००० कोटींचा हा आराखडा असून याला आता मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाच्या शिखर समितीने मंजुरी दिल्याने पंढरपुरात लवकरच या कामाला सुरुवात होणार आहे.

ओम मयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे
सुवर्णस्पर्शने होईल
प्रत्येक क्षण समृद्धीचा...
लग्नसराईसाठी खास ऑफर
दागिन्यांच्या मजुरीवर
60 % पर्यंत
भरघोस सूट!
ऑफर कालावधी: १ एप्रिल ते १८ मे २०२६
नियम व अटी लागू
सोने । चांदी । हिरे | अशोक चौक, संगमनेर. मो : 937201 2044

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
होलसेल बस्ता बांधा मस्त
ऑफर मिळतेय जबरदस्त !
१०१ भाग्यवंत जोडप्यांना
चक्क FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226 | अहिल्यानगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
आपल्यासाठी घेऊन आले आहे
विवाह खरेदी
मोहत्सव निमित्त
मजुरीवर 25%
डिस्कऊंड
ऑफर फक्त 27 एप्रिल ते 17 मे पर्यंत
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
7599996999/70661 49090

# महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन अध्यक्षपदी मुरलीधर मोहोळ



मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या (एमओए) अध्यक्षपदी असोसिएशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात पार पडलेल्या असोसिएशनच्या सर्वसाधारण सभेत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. अजित पवार यांच्या जाण्यानंतर हे पद काही काळ रिक्त होते. राज्याच्या क्रीडा क्षेत्रात मोहोळ यांच्या निवडीमुळे नवचैतन्य निर्माण झाले आहे. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ हे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष असून या संघटनेच्या माध्यमातून त्यांची महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी निवड झाली होती. गेल्या वर्षी महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या निवडणुकांमध्ये मोठे राजकीय नाट्य पाहायला मिळाले होते. त्यावेळी अध्यक्षपदासाठी अजित पवार यांच्या विरोधात मुरलीधर मोहोळ यांनी शड्डू ठोकला होता. मात्र, ऐनवेळी दोन्ही नेत्यांमध्ये तडजोड झाली आणि अजित पवार यांची अध्यक्षपदी तर मुरलीधर मोहोळ यांची उपाध्यक्षपदी वर्णी लागली होती. आता अजित पवारांच्या निधनानंतर मोहोळ यांनी या संघटनेची धुरा आपल्या हाती घेतली आहे. अजित पवार यांच्यानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचे नावही या पदासाठी चर्चेत होते. त्यांनी नुकतेच खो-खो असोसिएशनच्या माध्यमातून संघटनेत प्रवेश केल्याने त्यांच्या निवडीच्या शक्यता वर्तवण्यात येत होत्या. पण, पक्षातील वरिष्ठ नेत्यांशी झालेल्या चर्चेनंतर अखेर मुरलीधर मोहोळ यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम मिळाला असून मोहोळ यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे.

# अहवाल न देता मते मागवण्यावर संताप - माकप

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाबाबत न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या एक सदस्यीय समितीने १६ मार्च २०२६ रोजी शासनाला आपला अहवाल सादर केला आहे. त्यानंतर १० एप्रिल २०२६ रोजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली या संदर्भात एक समिती स्थापन करण्यात आली. यानुसार जनतेकडून बदर समितीच्या अहवालावर ३० एप्रिल २०२६ पर्यंत आक्षेप, मते व निवेदने मागविण्यात आली. मात्र ज्या अहवालावर आक्षेप, मते व निवेदने मागविण्यात आली तो अहवालच सरकारच्या वतीने सार्वत्रिक करण्यात आलेला नाही. जनतेला अहवाल माहीत नसताना त्यावर कुणी आक्षेप कसा घेऊ शकेल? असा प्रश्न या संदर्भात उपस्थित झाला आहे.

उपवर्गीकरणाचा उद्देश अनुसूचित जातींमधील अंतर्गत विषमता कमी करणे हा असेल तर त्या विषमतेचे स्वरूप व विषमतेची शास्त्रीय वस्तुस्थिती स्पष्ट होणे आवश्यक आहे. व्यापक सर्वेक्षणाच्या आधारे विषमतेचे स्वरूप व वस्तुस्थिती जनतेसमोर मांडल्यानंतरच याबाबतच्या विषमता निर्मूलनाबाबत उपाय सुचविणे व भूमिका घेणे शक्य आहे. अशा प्रकारे व्यापक सर्वेक्षण न करता व समितीने तयार केलेला अहवाल सार्वत्रिक न करता जनतेकडून मते मागवणे किंवा याबाबत कोणताही निर्णय करणारी कृती करणे सर्वथा अवैज्ञानिक आहे.



अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा मुद्दा विषमतेबाबतच्या सर्वेक्षणाशिवाय पुढे नेणे जसे योग्य नाही तसेच जातीनिहाय जनगणनेच्या शिवाय सुद्धा असे करणे चुकीचे आहे. सरकारने अगोदर जातनिहाय जनगणना पूर्ण करावी व अनुसूचित जाती अंतर्गत विषमतेचे व्यापक सर्वेक्षण करावे त्यानंतरच याबाबतची मते मागवावी असे आवाहन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने करत आहोत.

मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली आरक्षण उपवर्गीकरणाबाबत नेमण्यात आलेली समिती ही तीन वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांची समिती आहे. या समितीमध्ये समाजशास्त्रज्ञ, सामाजिक विषयाचे तज्ञ तसेच अनुसूचित जातींचे प्रतिनिधी घेण्यात आलेले नाहीत. यामुळे या अत्यंत गंभीर व संवेदनशील मुद्द्यावर समितीने घेतलेले निर्णय व काढलेले निष्कर्ष चुकू शकतात. सरकारने वर्गीकरणाचे काय व कसे करायचे याबाबतचा निर्णय अगोदरच घेतला असून केवळ सोपस्कार म्हणून मते व आक्षेप मागितले जात आहेत असा निष्कर्ष काढण्यास यामुळे जागा निर्माण झाली आहे. अनुसूचित जाती अंतर्गत एकजुटीवर या संपूर्ण प्रक्रियेचा गंभीर परिणाम होत असून यामुळे महाराष्ट्राची सामाजिक वीण कलुषित होऊ पाहत आहे. उपवर्गीकरणा सारख्या संवेदनशील विषयावर विषमतेबाबतचे व्यापक सर्वेक्षण, विषयाची सखोल विविधांगी माहिती, ठोस आकडेवारी, जातनिहाय जनगणना व या आधारावर व्यापक चर्चा आणि विचार करूनच निर्णय होणे आवश्यक आहे. सरकारने यासाठी वरील सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करून या प्रश्नाबाबत सुरू असलेली अपारदर्शकता तातडीने थांबवावी व समितीचा अहवाल आणि विषमतेबाबतची आकडेवारी चर्चेसाठी खुली करावी अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव डॉ. अजित नवले, शलेंद्र कांबळे, बब्रुवाहन पोटभरे यांनी केली.

# राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची राजहंस दूध संघाला भेट

युवावार्ता (प्रतिनिधी)-

संगमनेर - दूध व्यवसायाने शेतकऱ्यांना मोठी मदत केली आहे. दूध उत्पादनामध्ये भारत हा जगात प्रथम क्रमांकाचा देश असून महाराष्ट्रात देशामध्ये सहाव्या क्रमांकाने दूध उत्पादन होते. दूध विक्रीला झोनबंदी नसून विश्वास आणि गुणवत्तेमुळे राजहंस हा ब्रँड झाला असल्याचे गौरवोद्गार राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी काढले आहे.

संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संघाला त्यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा दूध संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी समवेत दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह देशमुख, व्हा.चेअरमन राजेंद्र चकोर, बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी, शेतकी संघाचे चेअरमन संपतराव डोंगरे ,संचालक संतोष मांडेकर, विलास कवडे, विक्रम थोरात, बादशहा वाळुंज, संजय पोकळे, बबनराव कुऱ्हाडे, विष्णू ढोले, तुकाराम दातीर, रवींद्र रोहम, डॉ. प्रमोद पावसे, सौ. मंदा नवले, कार्यकारी संचालक डॉ. सुजित खिलारी यांच्यासह अमृत उद्योग समूहातील विविध पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना ज्येष्ठ नेते हरिभाऊ बागडे म्हणाले की, मी शाळा सोडल्यानंतर दूध व्यवसाय सुरू केला आणि त्या माध्यमातून सुरुवातीला संगमनेरला येण्याचा योग आला. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांची शिस्त ही सर्वांना दिशादर्शक ठरली. या परिसरात लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली हा समृद्ध सहकार उभा राहिला आहे. दूध व्यवसायात देश जगामध्ये प्रथम क्रमांकाचा आहे. उत्पादन आणि विक्री आपल्याकडे चांगली आहे. उत्तर प्रदेश, राजस्थान



पाठोपाठ महाराष्ट्राचा दूध उत्पादनात सहावा क्रमांक आहे. राजहंस दूध संघाने विश्वास प्रामाणिकपणा आणि गुणवत्तेमुळे आपला स्वतःचा ब्रँड निर्माण केला.

खाजगीकरणाची स्पर्धा आहे. परंतु सहकार हा सर्वसामान्यांच्या विकासासाठी असतो म्हणून सहकार जपला पाहिजे. आज सहकारी दूध संघांमधून पस्तीस टक्के तर खाजगी मधून ६५ टक्के दूध संकलन होत आहे. सहकारी संघांमधून होणाऱ्या राज्याच्या संकलनामध्ये राजहंस दूध संघाचाच ६५ टक्के वाटा आहे असे सांगताना रणजीतसिंह देशमुख हे शांत स्वभावाचे असून सर्वांना सोबत घेऊन पुढे जाणारे आहेत. त्यांनी एमडीएम गोठा, मुरघास याचबरोबर आता नव्याने मिशन ५० लिटर हाती घेतले आहे. दूध क्षेत्रामध्ये निर्माण केलेले हे नवे दालन महाराष्ट्रासाठी नक्कीच मार्गदर्शक ठरणारे आहे.

तर रणजीतसिंह देशमुख म्हणाले की, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी स्थापन केलेल्या दूध संघाची ४०० लिटर पासून सुरू झालेली वाटचाल आता ४ लाखापर्यंत येत आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली दूध संघाने कायम शेतकरी केंद्रबिंदू मानून त्याच्या आर्थिक विकासासाठी काम केले आहे. गुणवत्ता आणि उच्च प्रतीचे दूध असल्यामुळे कर्नाटक, महाराष्ट्र आणि गुजरात मध्ये मोठी विक्री आहे. सुमारे ५५० कोटींची दूध संघाची आर्थिक उलाढाल होत असून चांगल्या दराबरोबर दिवाळीला रिबेटच्या रूपाने शेतकऱ्यांना मोठी मदत केली जात असल्याचे ते म्हणाले. हरिभाऊ बागडे यांनी दूध व्यवसायामध्ये मोठे काम केले असून महानंदामध्ये आपल्याला कायम मार्गदर्शन केले असल्याचे ते म्हणाले.

# सेल्फीचा मोह जीवावर बेतणार

## एक्स्प्रेसवेवर पोलिसांची कडक कारवाई

पुणे अंतर कमी करण्यासाठी यशवंतराव चव्हाण मुंबई- पुणे द्रुतगती मार्गावर बांधण्यात आलेल्या 'मिसिंग लिंक' चे लोकार्पण झाल्यानंतर यावरील 'केबल स्टेड' पुलावर सेल्फी काढण्यासाठी वाहनचालक, प्रवासी मोठ्या प्रमाणात थांबत आहेत. यामुळे गंभीर अपघात होण्याची शक्यता असल्याने अशा व्यक्तींवर धडक कारवाईसाठी वाहतूक पोलिस ॲक्शन मोडवर आले असून, शनिवार, रविवारी त्यांनी सुमारे ९० वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई केली. 'मिसिंग लिंक'वरील तब्बल १८२ मीटर उंचीचा ''केबल स्टेड' पूल आकर्षण ठरला आहे. त्यामुळे प्रकल्पातील ८.८७ किमी लांबीच्या बोगद्याच्या प्रवेशद्वारावर थांबून अनेकजण छायाचित्रे, सेल्फी काढतात. या द्रुतगती मार्गावर भरधाव वेगाने वाहने धावत असल्याने अशा व्यक्तींच्या वाहनांना धडक बसून अपघात होण्याची शक्यता आहे. या भागात वाहने उभी करणे बेकायदेशीर आहे. मात्र तरीही अनेकजण ती उभी करतात. त्यातून आता वाहतूक पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. त्यासाठी पोलिसांनी या महामार्गावर वाहने तैनात केली असून, हे पथक एक्स्प्रेस वेवर वाहने उभी करणाऱ्यांवर कारवाई करत आहेत. वाहनांना ५०० रुपये दंड आकारण्यात येत आहे, अशी माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी दिली.दरम्यान, भाजप प्रदेश उपाध्यक्ष केशव उपाध्ये यांनीही या मार्गावरील केबल स्टेड पुलावर वाहन थांबवून छायाचित्र काढले होते. ते समाजमाध्यमातून प्रसारित केले होते. त्यावरून त्यांच्यावर टीका होत आहे. सीसीटीव्ही, स्वतंत्र नियंत्रण कक्षाची असणार करडी नजरया 'कनेक्टिंग लिंक' प्रकल्पातील दोन बोगदे आणि दोन पुलांवर पूर्णपणे २४ तास सीसीटीव्हीद्वारे लक्ष दिले जात आहे. यावर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष असून, द्रुतगती मार्गावर थांबणाऱ्या गाड्यांची माहिती महामार्ग पोलिसांना दिली जाणार आहे, असा इशारा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) दिला आहे. तसेच सेल्फी, छायाचित्रे आणि रिल काढण्यासाठी थांबू नका, नाहीतर मोठ्या दंडाची आकारणी होऊ शकते. तसेच तुमच्यासह इतरांच्याही वाहनांना धोका होऊ शकतो, असेही 'एमएसआरडीसी'ने म्हटले आहे.

# चिंचपूर शिवारात जबरी चोरीचा प्रयत्न फसला

युवावार्ता (प्रतिनिधी)

आश्वी - संगमनेर तालुक्यातील चिंचपूर शिवारात शनिवारी (दि.२) सायंकाळी एका धाडसी महिलेमुळे मोठी चोरी टळली आहे. घरात घुसलेल्या चोरट्याने चाकूचा धाक दाखवूनही डगमगून न जाता या महिलेने लोखंडी रॉड घेऊन प्रतिहल्ला केल्याने चोरट्याला पळ काढावा लागला. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या याबाबत माहितीनुसार, चिंचपूर शिवारातील आठमोऱ्या परिसरात भारत धोंडीराम अनर्थे - यांचे कुटुंब वास्तव्यास आहे. शनिवारी सायंकाळी घरातील महिला नेहमीची कामे करत असताना, अचानक एक अज्ञात चोरटा घरात घुसला. त्याने कपाटाची आणि सामानाची उच उचकापाचक करण्यास सुरुवात केली. नेमका आवाज कशाचा येतोय हे पाहण्यासाठी महिला पोहोचली असता, चोरट्याने तिला चाकूचा धाक दाखवून शांत बसवण्याचा प्रयत्न केला. चोरट्याला पाहून महिला घाबरली, परंतु तिने प्रसंगावधान राखत आरडाओरडा सुरू केला. इतक्यावरच न थांबता, जवळच पडलेला लोखंडी रॉड उचलून ती चोरट्याच्या अंगावर धावून गेली. महिलेचे हे रौद्र रूप पाहून चोरट्याने तेथून धूम ठोकली. घराबाहेर आणि आत मिळून साधारण दोन ते तीन चोरटे असावेत असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. आरडाओरडा ऐकून शेजारील नागरिक मदतीला धावून आले, तीपर्यंत चोरटे पसार झोले होते. सुदैवाने, या घटनेत कोणतेही आर्थिक नुकसान अथवा मुद्देमाल चोरीला गेला नाही.

या घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांनी तत्काळ सहकाऱ्यांसमवेत घटनास्थळी धाव घेतली. तसेच गावातील १५० ते २०० तरुण आणि ग्रामस्थांच्या मदतीने परिसरात रात्री दोन वाजेपर्यंत शोधमोहीम राबवली, मात्र, चोरट्यांचा मागमूस हाती लागला नाही. रविवारी (दि.३) सकाळी ठसेतज्ज्ञ आणि श्वान पथक तपासकामी घटनास्थळी आले होते. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक शिरसाट यांच्यासह पोलीस पाटील दत्तात्रेय तांबे, अशोक थेटे, विवेक तांबे आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, चिंचपूरमधील या घटनेचा अद्याप अधिकृत गुन्हा दाखल झाला नसला, तरी सहाय्यक पोलीस गुन्हेगाराचे धागेदोरे शोधत आहेत. नागरिकांनी खबरदारी घ्यावी आणि संशयास्पद हालचाली दिसल्यास ताबडतोब पोलिसांना कळवावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# अवैध वाळूतस्करीची माहिती देणाऱ्यालाच पोलिसांकडून दमदाटी; ऑडिओ क्लिप व्हायरल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यात कायदा व सुव्यवस्थेच्या अंमलबजावणीबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी धक्कादायक घटना घारगाव परिसरात उघडकीस आली आहे. गुन्ह्याची माहिती द्या, तुमचे नाव गुपित ठेवले जाईल, असे आवाहन करणाऱ्या पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच या घटनेमुळे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

तालुक्यातील अवैध वाळूतस्करीची माहिती शासकीय हेल्पलाईन ११२ वर देणाऱ्या एका प्रतिष्ठित सामाजिक कार्यकर्त्यालाच घारगाव पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्याने उलट दमदाटी करत 'चोर' ठरविल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या संपूर्ण संभाषणाची ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने साकूर पठार भागात मोठी खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, साकूर परिसरातील मुळा नदी पात्रातून गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा सुरू आहे. याबाबत सजग नागरिक म्हणून साकूर येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन खेमनर यांनी ११२ क्रमांकावर तक्रार नोंदवली होती. मात्र, या तक्रारीची दखल घेऊन संबंधितांवर कारवाई करण्याऐवजी घारगाव पोलीस ठाण्यातील कर्मचारी चांगदेव नेहे यांनी तक्रारदारालाच फोन करून उलट चौकशी करत दमदाटी केल्याचे उघड झाले आहे.

व्हायरल झालेल्या ऑडिओ क्लिपमध्ये संबंधित पोलीस कर्मचारी अत्यंत उद्धट व अरेरावीच्या भाषेत बोलताना ऐकू येत असून, चोरांनी चोराची साक्ष देऊ नये, अशा शब्दांत तक्रारदाराचा अपमान करण्यात आला आहे. तसेच तुला कोणाला फोन करायचा त्याला कर, डीवायएसपींना सांग किंवा गृहमंत्र्यांनाही सांग, मी कोणाच्या बापाला घाबरत नाही, अशी मुजोर भाषा वापरल्याचेही या क्लिपमधून स्पष्ट होते. तक्रारदाराने वारंवार आपण केवळ माहिती दिल्याचे सांगूनही पोलिसांकडून त्यांना तुच्छतेची वागणूक देण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, माहिती देणाऱ्यांचे संरक्षण करण्याऐवजी त्यांनाच त्रास दिला जात असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. दरम्यान, साकूर, मांडवे व आसपासच्या भागात अवैध वाळूतस्करी मोठ्या प्रमाणात वाढली असून, काही पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाठबळामुळेच तस्करांचे धाडस वाढल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे.

# एसी स्फोटमुळे तब्बल जणांचा 9 मृत्यू

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

दिल्लीच्या शाहदारा जिल्ह्यातील विवेक विहार भागात रविवारी पहाटे एका चार मजली निवासी इमारतीला एसीच्या स्फोटामुळे भीषण आग लागली. या दुर्घटनेत तब्बल ९ जणांचा मृत्यू झाला असून, अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. आगीच्या घटनेने परिसरात हाहाकार उडाला असून, बचावकार्य अंतीम टप्प्यात पोहोचले आहे.

विवेक विहार बी-१३ इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर पहाटे सुमारे ३:२७ वाजता एसीचा जोरदार स्फोट झाला, ज्यामुळे आग भडकली आणि क्षणात संपूर्ण इमारतीत पसरली. मोठा आवाज घेऊन झालेल्या या स्फोटामुळे रहिवासी भितीमुळे घाबरले आणि दरवाजे उघडता आले नाहीत. अग्निशमन दलाला माहिती मिळाल्यानंतर १४ दमकल वाहने आणि ८० हून अधिक अग्निशमन कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. सुमारे अडीच तासांच्या अथक प्रयत्नांनंतर सकाळी ६:२५ वाजता आगीवर पूर्ण नियंत्रण मिळवण्यात आले.

या आगीत ९ मृतदेह बाहेर काढण्यात आले असून, यात ४ पुरुष, ४ महिला आणि १ मूल समाविष्ट आहे. चार ते सहा जण गंभीर भाजले असून, त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. काही जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याने मृतांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अग्निशमन दल आणि पोलिसांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे १४ ते २० रहिवाशांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. स्थानिक रहिवाशांच्या मते, काही लोक अजूनही अडकले असावेत असा संशय होता, पण पोलिसांनी हे फेटाळले आहे. मृतदेहांची इतकी वाईट स्थिती आहे की, पुरुष-स्त्रीची ओळख पटवणे कठीण आहे आणि डीएनए तपासणी आवश्यक आहे. या आगीमुळे इमारतीचे प्रचंड नुकसान झाले असून, सध्या कुलिंग ऑपरेशन सुरू आहे. तीन-चार दिवसांपूर्वीच दिल्लीत अशाचप्रकारची आगीची घटना घडली असतानाच ही दुर्घटना घडली आहे, ज्यामुळे रस्ता सुरक्षा आणि अग्निसुरक्षेच्या उपाययोजना संदर्भात प्रश्न उपस्थित होत आहेत. पोलिसांकडून आग कारणाचा तपास सुरू असून, शॉर्ट सर्किटची शक्यता तपासली जात आहे.

# श्रमिक पत्रकार संस्थेच्या अध्यक्षपदी तिवारी

## उपाध्यक्षपदी सालपे तर सचिवपदी मदने व कोषाध्यक्षपदी मतकर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पत्रकारितेतील एकता आणि सहकार्याचा वारसा जपणाऱ्या तसेच स्थानिक पत्रकारांच्या हक्कासाठी लढणाऱ्या संगमनेर श्रमिक पत्रकार संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत नूतन पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. आगामी वर्षासाठी झालेल्या या निवडींमध्ये संघाच्या अध्यक्षपदी श्याम तिवारी, उपाध्यक्षपदी मंगेश सालपे, सचिवपदी गोरक्षनाथ मदने व कोषाध्यक्षपदी अमोल मतकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

संगमनेर श्रमिक पत्रकार संस्था ही पत्रकारांच्या सुख - दुःखात नेहमीच पुढे असते. अनेक समाज



हिताचे व पत्रकारांना प्रोत्साहन देणारे कार्यक्रम देखील या संस्थेने घेतलेले आहेत. त्याच बरोबर पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिर राबविले आहे. माजी अध्यक्ष संजय अहिरे यांच्या संकल्पनेतून त्यांनी संघटनेतील सर्व पदाधिकारी व सदस्य यांचा कौटुंबिक स्नेह मेळावा आयोजित केला होता. संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सर्वच कार्यक्रमापेक्षा सुंदर असा स्नेह मेळावा पार पडला. तसेच सर्वांनीच याचे तोंड भरून कौतुक केले. दरवर्षी महाराष्ट्र दिनापूर्वी संस्थेची बैठक घेवून नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात येत असते. त्यानुसार या बैठकीत वरीलप्रमाणे नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या. विशेष म्हणजे संगमनेरच्या पत्रकारिता क्षेत्रात प्रदीर्घकाळापासून एकसंध राहिलेली ही संस्था आहे. त्यामुळे एकमताने निवड करण्याची परंपरा यावेळीही कायम राहिली.

यावेळी मावळते अध्यक्ष संजय अहिरे यांनी गेल्या वर्षभरातील कामकाजाचा आढावा सादर केला. माजी उपाध्यक्ष शेखर पानसरे यांनी मागील वर्षाचा जमा-खर्च मांडला, तर माजी सचिव सतीश आहेर यांनी प्रास्तविक केले व सर्व उपस्थितांचे स्वागत केले.

यावेळी पत्रकार सुनील नवले, संजय अहिरे, सोमनाथ काळे, शेखर पानसरे, सतीश आहेर, संदीप वाकचौरे, गोरक्ष नेहे, आनंद गायकवाड, नीलिमा घाडगे, धीरज ठाकूर, बाबासाहेब कढू, सचिन जंत्रे, काशिनाथ गोसावी, सुनील महाले, भारत रेघाटे, सुशांत पावसे आदि उपस्थित होते. नूतन पदाधिकाऱ्यांचे राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रांतून अभिनंदन होत आहे.

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

ताम्हाणे हॉस्पिटल
पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ ?
पाईल्स (PILES)
फिशर (FISSURE)
फिस्टुला (FISTULA)
7219100100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# आ. अमोल खताळ यांच्या जनसंपर्क कार्यालयात उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते नागरी सहाय्यता कक्षाचा शुभारंभ

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
संगमनेर शहरात शिवसेना महायुतीचे आमदार अमोल खताळ यांच्या जनसंपर्क कार्यालयात 'धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्षा'चा भव्य शुभारंभ उपमुख्यमंत्री व शिवसेना पक्षाचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाला. या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांना त्यांच्या विविध अडचणी व प्रश्न सोडवण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. सामान्य नागरिकांना शासकीय कार्यालयांमध्ये अनेक वेळा विविध प्रक्रियांमुळे अडचणींचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर नागरिकांना शासकीय योजनांची अचूक माहिती, अर्ज भरण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन, तसेच समस्या सोडवण्यासाठी योग्य त्या विभागाशी समन्वय साधून त्वरित मदत मिळावी, या उद्देशाने या नागरी सहाय्यता कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.



उद्घाटन सोहळ्यास नेवासेचे आमदार विठ्ठलराव लंघे, सामाजिक कार्यकर्त्या नीलम खताळ, मंगल खताळ, राहुल खताळ, शिवसेनेचे जिल्हा संघटक विठ्ठल घोरपडे, उपजिल्हाप्रमुख रमेश काळे, तालुकाप्रमुख रामभाऊ राहणे, राजेंद्र सोनवणे, तालुका संघटक मंजा बापू साळवे, शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी, महिला उपजिल्हाप्रमुख दिपाली वाव्हळ, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, संगीता पुंड, सपना जाधव, युवासेना उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख, तालुकाप्रमुख सुशील शेवाळे, शहरप्रमुख सार्थक शेवाळे, आरपीआय शहराध्यक्ष कैलास कासार, शशांक नामन, अक्षय वर्पे, ऋषिकेश मुळे, राहुल सोमवंशी यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाला शिवसैनिक, पदाधिकारी व स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. या उपक्रमाचे सर्व स्तरातून स्वागत करण्यात येत असून, भविष्यातही अशा नागरिकाभिमुख योजना राबवण्यात याव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी व त्यांना शासनाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हा सहाय्यता कक्ष एक महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

नागरिकांसाठी मदतीचा नवा आधार -

विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांना या उपक्रमाचा मोठा फायदा होणार असून, प्रशासन आणि जनतेमधील दरी कमी करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून निवारा, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सामाजिक सुरक्षा यांसारख्या विविध शासकीय योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवली जाणार आहे. तसेच पात्र लाभार्थ्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक ती मदत व सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी कमी होऊन त्यांना शासनाच्या सुविधा अधिक सुलभपणे उपलब्ध होणार आहे.

# श्रमिक कनिष्ठ महाविद्यालयाचे बारावी निकालात झळाळते यश

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
संगमनेर येथील श्रमिक ज्युनिअर कॉलेजच्या इयत्ता बारावी (कला, वाणिज्य व विज्ञान) विभागाने यंदाच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले असून, विद्यार्थ्यांनी विविध विषयांत शंभर पैकी शंभर गुण मिळवत महाविद्यालयाचा नावलौकिक वाढविला आहे.



बुक कीपिंग अँड अकाउंटन्सी या विषयात पार्थ अट्टल याने १०० पैकी १०० गुण मिळवले. संस्कृत विषयात श्लोक पवार व श्रेया परदेशी यांनी प्रत्येकी १०० पैकी १०० गुण मिळवत विशेष प्रावीण्य मिळविले.

तसेच मेकॅनिकल मेंटेनन्स विषयात ऐश्वर्या अढांगळे, रियांश भोसले, अस्मिता गायकवाड, प्रथमेश गुंजाळ, ओम मोरे, ईश्वरी फटांगरे व यश थेटे या विद्यार्थ्यांनी २०० पैकी २०० गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

महाविद्यालयाच्या कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील गुणवत्ता यादीत यश थेटे याने ६०० पैकी ५७२ गुण (९५.३३%) मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. भाविन कटारिया (५७१ गुण, ९५.१७%) द्वितीय, तर पार्थ अट्टल (५६४ गुण, ९४.००%) तृतीय क्रमांकावर राहिला. आर्या पवार (५६० गुण, ९३.३३%) व ईश्वरी फटांगरे (५५७ गुण, ९२.८३%) यांनी अनुक्रमे चौथा व पाचवा क्रमांक मिळविला.

या यशाबद्दल शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी, सचिव डॉ. अनिल राठी, प्राचार्य प्रो. डॉ. अरुण गायकवाड, उपप्राचार्य डॉ. राजेंद्र ढमक तसेच पर्यवेक्षक प्रा. आप्पासाहेब गुंजाळ यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सर्व शिक्षकवृंदांनीही विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या असून, या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# पूर्वा जाजू वाणिज्य शाखेत अकोले तालुक्यात प्रथम

अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)-
एच.एस.सी. बोर्डाचा निकाल नुकताच लागला असून, त्यामध्ये येथील कु. पूर्वा जाजू ही तालुक्यात सर्वप्रथम आली आहे. कु. पूर्वा ज्योती धनंजय जाजु ही मॉडर्न हायस्कूल ज्युनिअर कॉलेज, अकोलेची विद्यार्थिनी असून, तेथे विज्ञान, कला, वाणिज्य शाखेत प्रथम, तर वाणिज्य शाखेत अकोले तालुक्यात सर्वप्रथम येण्याचा बहुमान तिने पटकविला आहे. पत्रकार अजय जाजू यांची ती पुतणी आहे.

मॉर्डन हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, अकोलेचा एकूण निकाल ९३.९०% लागला आहे. तर विभागनिहाय विज्ञान विभाग ९७.६५%, कला विभाग ८४.८४% व वाणिज्य विभाग ९६.१५% असा निकाल लागला आहे. तिन्ही शाखेत मुलींनीच बाजी मारल्याचे दिसते.

मॉडर्न कॉलेजच्या कला, वाणिज्य व विज्ञान विभागात प्रथम आलेली पूर्वा धनंजय जाजू ही वाणिज्य विभागात अकोले तालुक्यात देखील सर्वप्रथम आली आहे, तर



मॉडर्न कॉलेजमध्ये वाणिज्य विभागात द्वितीय क्रमांक कृष्णा राजेंद्र अभंग व तृतीय क्रमांक तृप्ती सूर्यभान गजे ने पटकाविला आहे.

विज्ञान विभागात गौरी विजय शेलार सर्वप्रथम असून, समीक्षा दत्तात्रय उतरडे व श्रुती भानुदास धुमाळ यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. कला विभागात प्रतीक्षा किसन मालुंजकर, स्वातीया रशिद तांबोळी व सपना सोमनाथ मेंगाळ यांनी प्रथम तीनमध्ये येण्याचा बहुमान मिळविला. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# केंद्र प्रमुख कदम यांच्याकडून गर्दणी शाळेसाठी पुस्तकांची अनमोल भेट



अकोले
(युवावार्ता प्रतिनिधी)-
ग्रंथ हेच गुरू, या विचाराने प्रेरित होऊन केंद्रप्रमुख विनायक कदम यांनी त्यांच्या निरोप समारंभाचे औचित्य साधून गर्दणी जिल्हा परिषद शाळेला नुकतीच पाच हजार रुपयांची १०१ वाचनीय पुस्तके भेट देऊन नवा आदर्श रुजविला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्याच्या दृष्टीने पुस्तकांची ज्ञानरूपी भेट लाखमोलाची ठरणार असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

यावेळी जिल्हा परिषद शाळा, गर्दणी, शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामपंचायत तर्फे केंद्रप्रमुख विनायक कदम यांचा गुणगौरव व सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी गर्दणी ग्रामपंचायतीच्या सरपंच साधनाताई अभंग, पोलीस पाटील संतोष अभंग, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ईश्वर मडके, नानासाहेब मंडलिक, जेडगुले बाबा उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्या मनोगतातून कदम सरांच्या उल्लेखनीय शैक्षणिक कामाची पोचपावती म्हणजे त्यांना मिळालेली पदोन्नती आहे, अशा भावना व्यक्त करण्यात आल्या. शाळेचे मुख्याध्यापक सोमनाथ घोरपडे यांनी सरांचा वक्तशीरपणा व गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी दिलेले योगदान याबद्दल मनोगतातून गौरवोद्गार काढले.

या सुंदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक पदवीधर शिक्षिका मीनाकुमारी गोडसे, सूत्रसंचालन राजेंद्र भाग्यवंत, फलक लेखन संतोष सदगीर, पूर्वतयारी आशा देशमुख व पी. एस. शिंदे यांनी आभार व्यक्त केले. केंद्रप्रमुख विनायक कदम यांनी संस्मरणीय गौरव सोहळ्याचे आयोजन केल्याबद्दल सर्वांचे हदयस्थ आभार मानले. कार्यक्रमाच्या समारोपानंतर विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन देण्यात आले.

# सौर ऊर्जा प्रकल्पामुळे दुर्गम गुहिर गाव उजळले

## सचिन तेंडुलकरांच्या हस्ते प्रकल्पाचे लोकार्पण

पालघर (प्रतिनिधी)-
पालघर जिल्ह्यातील गुहिर हे दुर्गम खेडेगाव सौर ऊर्जा आधारित प्रकल्पामुळे विजेबाबत स्वयंपूर्णतेकडे झेपावले असून, एकेकाळी अंधाराशी झुंज देणारे हे लहानसे, दुर्लक्षित गाव आता कायमस्वरूपी उजेडाच्या दिशेने वाटचाल करत आहे. निरंतर वीजपुरवठ्यामुळे गावातील जीवनमानात आमूलाग्र बदल होणार असून, डिजिटल स्वरूपात उभारलेल्या जिल्हा परिषद शाळेला अखंडित वीज मिळणार आहे. त्यामुळे दुर्गम, आदिवासी आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांचे शिक्षण अधिक प्रभावी, अर्थपूर्ण आणि आनंददायी होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यासोबतच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आणि शेतीसाठी लागणाऱ्या विजेची गरजही मोठ्या प्रमाणात सुटणार आहे. सौर ऊर्जा आधारित या महत्त्वाकांक्षी उपक्रमामुळे गावात अक्षय ऊर्जेचा स्थिर स्रोत निर्माण झाल्याने गावाच्या सर्वांगीण प्रगतीची नवी पहाट उगवू लागली आहे. विजेच्या अभावामुळे ग्रामीण आणि आदिवासी भागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांवर हा प्रकल्प प्रभावी उत्तर ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

सचिन तेंडुलकर फाउंडेशन आणि स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया यांच्या संयुक्त माध्यमातून देशभरातील ५०० हून अधिक शाळा सौर ऊर्जेवर आधारित करण्यात आल्या असून, या डिजिटल शाळांमधून दीड लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत




आहेत. जागतिक तापमानवाढीच्या पार्श्वभूमीवर गावामध्ये पर्यावरणाचा समतोल राखून सर्वांगीण विकास साधायचा असेल, तर विकासाची दृष्टी आणि नागरिकांची एकजूट महत्त्वाची असल्याचे मत सचिन तेंडुलकर यांनी व्यक्त केले. पालघर जिल्ह्यातील गुहीर येथे सौर ऊर्जा आधारित प्रकल्पाचे लोकार्पण सचिन तेंडुलकर यांच्या हस्ते नुकतेच उत्साहात पार पडले. या प्रकल्पामुळे गुहीर हे दुर्गम गाव सौर ऊर्जा आधारित प्रकल्पामुळे स्वयंपूर्ण बनले आहे.

पालघर जिल्ह्याच्या वाडा तालुक्यातील गुहीर या गावामध्ये हा महत्त्वाकांक्षी, अनोखा सौर ऊर्जा आधारित प्रकल्प साकारण्यात आला आहे. सचिन तेंडुलकर फाउंडेशन आणि स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया या उद्योगसमूहांच्या संयुक्त माध्यमातून या प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली असून, बायफ या संस्थेतर्फे प्रकल्पासाठी तांत्रिक सहकार्य करण्यात आले आहे. जगविख्यात क्रिकेटपटू, भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्या हस्ते नुकतेच या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी स्नायडर इलेक्ट्रिक इंडियाचे सीईओ दीपक शर्मा, बायफ संस्थेचे अध्यक्ष भरत काकडे, विभागीय संचालक रविराज जाधव, संयुक्त विभागीय संचालक सुधीर वागळे, मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रदीप खोसे, गावाच्या सरपंच सरिता गायकर, स्थानिक नागरिक आणि शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामीण भागातील नागरिकांची उपजीविका सक्षम करणे, पायाभूत सुविधा बळकट करणे आणि जीवनाचा दर्जा उंचावण्यासाठी विश्वासार्ह व शाश्वत ऊर्जा उपलब्ध असणे महत्त्वाचे आहे. अनियमित वीजपुरवठा आणि पारंपरिक ऊर्जास्त्रोतांवर अवलंबून राहिल्याने निर्माण होणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी आधुनिक ऊर्जा तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक आहे. गुहिर हे 'क्लायमेट स्मार्ट व्हिलेज' म्हणून विकसित करण्याचे उद्दिष्ट असल्याचे सचिन तेंडुलकर यांनी स्पष्ट केले. ग्रामीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. प्रकल्पाची देखभाल आम्ही करू; मात्र ग्रामस्थांनी या सुविधांचा जीवनमान उंचावण्यासाठी पुरेपूर वापर करावा, असे आवाहन सचिन तेंडुलकर यांनी केले.

वारली चित्रकला फ्रेम व स्थानिक हस्तकला संच देऊन सचिन यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान एका शालेय विद्यार्थिनीने केलेल्या भाषणामुळे सचिन भारावून गेले. त्यांनी या चिमुकल्या विद्यार्थिनीला जवळ बोलावून घेऊन तिच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली. सचिन यांनी केलेल्या कौतुकाने ती चिमुरडी हरखून गेली. सचिन यांच्यासह या कार्यक्रमास त्यांची कन्या सारा तेंडुलकर व सून सोनिया तेंडुलकर यांचीही उपस्थिती होती.

सौर ऊर्जा प्रकल्पाची वैशिष्ट्ये : गुहिर येथे उभारण्यात आलेल्या ४० किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पामुळे गावातील १२३ घरे, शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालय आणि ३५ पथदिवे यांना अखंडित वीजपुरवठा मिळणार आहे. सौर ऊर्जेवर आधारित पाणीपुरवठा योजनेद्वारे प्रत्येक घरात नळाद्वारे स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध होणार आहे. याशिवाय, सौर ऊर्जेच्या सहाय्याने पीठ गिरणी, शेतमाल प्रक्रिया केंद्र सुरू करण्यात येणार असून, गावदेवी व वेतरणा पाणी वापर गटातील ६० शेतकऱ्यांच्या ६० एकर शेतीसाठी पाणीपुरवठा केला जाणार आहे. त्यामुळे भात शेतीबरोबरच रब्बी हंगामात भाजीपाला उत्पादन तसेच फळबागा आणि फुलशेती करणे शक्य होईल, ज्यामुळे शेतकऱ्यांच्या वार्षिक उत्पन्नात लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा आहे.

# ना. छगन भुजबळ यांची सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याला भेट



**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)– राज्याचे अन्न व नागरिक पुरवठा मंत्री नामदार छगन भुजबळ यांनी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याला भेट दिली. यावेळी माजी आमदार डॉ सुधीर तांबे, संगमनेर तालुका युवा काँग्रेसचे अध्यक्ष डॉ जयश्रीताई थोरात , सौ दुर्गाताई तांबे सर्व संचालक व कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी त्यांचे स्वागत केले.**

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

# संपादकीय...

## मतदानात महिलांची आघाडी प्रतिनिधित्वात मागे

चार राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशात सुरू असलेल्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतातील महिला मतदार पुन्हा एकदा राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आल्या आहेत, आणि हा बदल केवळ आकडेवारीपुरता मर्यादित नसून भारतीय लोकशाहीच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. भारताच्या निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, तामिळनाडू, केरळ आणि पुडुचेरी येथे महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक असून, आसाममध्ये दोघांची संख्या जवळपास समान आहे, तर पश्चिम बंगालमध्ये पुरुष मतदारांचे प्रमाण थोडे जास्त, म्हणजे ५१.२ टक्के आहे. विशेष पुनरावलोकन प्रक्रियेनंतर मतदार याद्यांमधील हा फरक पुरुषांच्या बाजूने काही प्रमाणात वाढला असला, तरी एकूणच महिला मतदारांची वाढती उपस्थिती ही देशपातळीवरील व्यापक प्रवृत्तींशी सुसंगत आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महिला मतदारांचे प्रमाण ४८.६२ टक्क्यांपर्यंत पोहोचले, जे आतापर्यंतचे सर्वाधिक आहे, आणि याहून महत्त्वाचे म्हणजे, महिलांची संख्या पुरुषांपेक्षा किंचित कमी असूनही त्यांनी मतदानाच्या वेळी पुरुषांपेक्षा अधिक मतदान केले, ही सलग दुसऱ्यांदा घडलेली घटना आहे; २०१९ मध्येही अशीच प्रवृत्ती दिसून आली होती. महिला मतदानातील ही वाढ साक्षरतेत झालेली वाढ, आर्थिक स्वावलंबन, स्थानिक पातळीवरील जनजागृती आणि निवडणूक आयोगाच्या विशेष उपक्रमांमुळे शक्य झाली आहे, परंतु यामागे सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे महिलांच्या विचारसरणीत झालेला आमूलाग्र बदल आहे, ज्यामध्ये मतदान हे केवळ कर्तव्य न राहता स्वतःच्या सक्षमीकरणाचे आणि निर्णयक्षमतेचे प्रभावी साधन म्हणून पाहिले जात आहे. तथापि, महिला मतदारांची वाढती संख्या आणि मतदानातील सक्रियता यांचा परिणाम त्यांच्या राजकीय प्रतिनिधित्वात तितक्याच प्रमाणात दिसत नाही, ही एक मोठी विसंगती आहे. २०२१ च्या आकडेवारीनुसार, या निवडणुका होत असलेल्या राज्यांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व अद्यापही मर्यादित आहे; पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक १३.७ टक्के महिला प्रतिनिधित्व आहे, त्यानंतर केरळमध्ये ७.८६ टक्के, तामिळनाडूमध्ये ५.१३ टक्के, आसाममध्ये ४.७६ टक्के आणि पुडुचेरीमध्ये केवळ ३.३३ टक्के प्रतिनिधित्व आहे. राष्ट्रीय स्तरावर लोकसभेत महिलांचे प्रमाण सुमारे १३.६ टक्के असून, ते २०१९ च्या तुलनेत कमी आहे आणि जागतिक सरासरी २७ टक्क्यांपेक्षा खूपच कमी आहे. या पार्श्वभूमीवर 'पाईपलाईन इफेक्ट'ची संकल्पना पुन्हा एकदा चर्चेत येते. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी आरक्षण लागू करताना अशी अपेक्षा होती की स्थानिक स्तरावरून महिला नेतृत्व विकसित होऊन पुढे विधानसभा आणि संसदेत त्यांचे प्रतिनिधित्व वाढेल, परंतु प्रत्यक्षात ही अपेक्षा पूर्ण झालेली दिसत नाही. केरळ आणि पश्चिम बंगालसारख्या राज्यांमध्ये पंचायत स्तरावर महिलांची चांगली उपस्थिती असूनही पुढील स्तरावर त्यांचे प्रमाण वाढत नसल्याचे स्पष्ट होते, आणि यामागे पक्षीय संधींचा अभाव, निवडणुकीचा वाढता खर्च, सामाजिक आणि लैंगिक भेदभाव यांसारख्या संरचनात्मक अडचणी जबाबदार असल्याचे दिसते. इतिहासाकडे पाहिले असता, महिलांच्या राजकीय सहभागाचा हा प्रवास अधिक ठळकपणे समोर येतो. १९५१-५२ मधील भारताच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत जवळपास २.८ दशलक्ष महिलांना निवडणूक आयोगाने अपात्र ठरवले होते, कारण त्यांनी स्वतःची ओळख स्वतंत्र नावाने नोंदवण्याऐवजी अमुकची आई किंवा तमुकची पत्नी अशा प्रकारे नोंदवली होती. त्या काळापासून आजपर्यंत झालेला बदल अत्यंत मोठा आहे, कारण आज महिला मतदार केवळ ओळख मिळवण्यापुरत्या मर्यादित नसून निवडणूक निकालांवर प्रभाव टाकणाऱ्या निर्णायक शक्ती बनल्या आहेत.


**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत **डायलेसिस सुविधा उपलब्ध**
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५


# परीक्षेत नापास म्हणजे आयुष्याचा अंत नाही...

नुकताच बारावीचा निकाल लागला. यावर्षीही परीक्षेत मुलींनी बाजी मारली. सर्व पास झालेल्या विद्यार्थ्यांचे खूप अभिनंदन. नापास झालेल्या अजिबात नाराज न होता, अपयश हीच यशाची पायरी आहे असे समजून परत अभ्यासाला लागणे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, बारावीची परीक्षा ही जीवनातील शेवटची परीक्षा नाही, आता तर परीक्षेला खरी सुरुवात झाली. पुढील जीवनात असंख्य परीक्षा आपल्याला द्यायच्या आहेत. बारावी नापास झाले म्हणून कोणीही आत्महत्येचा विचार करू नये. कारण आपले जीवन हे खूप सुंदर आहे. एका परीक्षेत नापास झाले म्हणजे सर्व संपले असे मुळीच नाही. आत्महत्या म्हणजे जीवनातील संकटांना घाबरून पळून जाणे. विद्यार्थी मित्रांनो! संकटांना कधीच घाबरायचे नाही. त्यावर मात करायची. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आपले आदर्श छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनात कितीतरी संकटे आलीत, परंतु ते डगमगले नाहीत. प्रत्येक संकटाला शूरपणाने लढून त्यांनी संकटावर मात केली. एवढा मोठा आदर्श आपल्यासमोर असताना आपण पळपुटेपणा का करावा.

परीक्षेमध्ये नापास झालेल्या अनेक थोर मंडळी आहेत. महात्मा गांधी, अल्बर्ट आईन्स्टाईन, जे. कृष्ण मूर्ती, यशवंतराव चव्हाण, लोकमान्य टिळक, चर्चिल, रामानुजन, कुसुमाग्रज, इंदिरा गांधी, आर के लक्ष्मण, शांता शेळके अशी असंख्य उदाहरणे आहेत. ही मंडळी गणित, मराठी, इंग्रजी विषयात नापास झाली होती. परंतु ती डगमगली नाही. त्यांनी परत जाऊन अभ्यास केला आणि यश मिळवले. परीक्षेत नापास म्हणजे आयुष्याचा अंत नाही.

पालकांनी आपल्या नापास झालेल्या पाल्याला तो मठ्ठ आहे, तो मंद आहेस हे बोलण्यापूर्वी खालील गोष्टी लक्षात ठेवाव्यात. चांगली चित्रकला नाही म्हणून प्रसिद्ध व्यंगचित्रकार आर के लक्ष्मण यांना जे. जे. आर्ट्स ने प्रवेश नाकारला होता. आर के नारायण यांनी हातावर उलट्या छड्या खाल्ल्या होत्या. श्रीरामचंद्र, राज कपूर, गुलजार हेही परीक्षांमध्ये नापास झाले होते. अण्णाभाऊ साठे फक्त तीन दिवस शाळेत गेले, परंतु ते प्रसिद्ध कादंबरीकार झाले. ही उदाहरणे पालकांनी आपल्या पाल्याला सांगावीत. आपला पाल्य नापास झाला असेल तर त्याला आश्वासक शब्द द्या.

तुझ्या मध्ये आत्मविश्वास आहे, तू करू



शकतो, तू पास होऊ शकतो, ही जाणीव त्याला करून घ्या. अत्यंत कळकळीने त्याच्याशी संवाद साधा. त्याला टोमणे मारू नका. अत्यंत शांतपणे कुठे चूक झाली हे दाखवून द्या. पहिली पायरी चुकली म्हणजे दुसऱ्या पायरीवर चूक सुधारून पुढचे पाऊल टाकणे, हे यशाचे गमक आहे, हे सांगा. पाल्याने आपल्या पाल्याला तीन गोष्टी सांगाव्यात - रिपीट, रीअपिअर आणि रिकव्हर. त्याला त्याच्या आवडत्या क्षेत्रामध्ये जाऊ द्या. आपल्या पाल्याकडून अवास्तव गुणांची अपेक्षा करू नका. त्या दडपणामुळे अनेक विद्यार्थी नापास होतात. आपल्या पाल्याविषयी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून, त्याला कमी गुण मिळाले तरी त्याचा बाऊ न करता पुढील परीक्षांमध्ये अनेक यश मिळण्याच्या दृष्टीने त्याला प्रोत्साहन द्या.

आपण आपल्या पाल्याचे पालक आहोत, मालक नाही, ही गोष्ट सतत लक्षात ठेवावी. आपल्या पाल्याला सपोर्ट करा. गिव्ह सपोर्ट अँड करेज देम टू लर्न देअर मिस्टेक्स अँड मूव्ह अहेड इन लाइफ. विद्यार्थी मित्रांनो, आपल्या मध्ये न्यूनगंड काढून टाका. मी हे करू शकणार नाही, मी पास होऊ शकणार नाही हा न्यूनगंड काढून टाका. मी पास होईल, मला चांगले मार्ग पडतील असा सकारात्मक विचार करा. आपल्या आयुष्यामध्ये वेळेला महत्त्व द्या. कारण मोठी मोठी माणसे ही त्यांच्या आयुष्यात वेळेला महत्त्व दिल्याने मोठी झाली. २४ तास ही वेळ प्रत्येकाला दिलेली आहे. त्याचे योग्य नियोजन करून आपण आपले आयुष्य चांगले घडवू शकतो. नापास झाले म्हणून घाबरू नका. आपल्या आयुष्याचे ध्येय निश्चित करा. आपल्याला निश्चित कुठे जायचे आहे हे ठरवा.

एडगर ए गेस्ट हा म्हणतो, माझ्या तरुण मित्रा, तूच कर तयार तुझं स्वतःचं तिकीट, लिही तूच तुझ्या हाताने त्यावर तुझं नाव, तुझं गाव, तुझी जन्म जन्मतारीख, कुठपर्यंत प्रवास करण्याचा विचार आहे तुझा, मार्गात काय काय पाहणार आहेस तू आणि लिही काय करायची इच्छा आहे तुझी, आणि कोण व्हायचंय तुला! नापास झालेल्या सर्वांना पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा.


**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मोबा. ९८९०१६३६४२**


# उद्योजक माणिकराव डावरे यांच्याकडून आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेजला ७५ इंची इन्ट्रॅक्टिव्ह पॅनल भेट

अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)- अकोले तालुक्याचे भूमिपुत्र तथा यशस्वी उद्योजक माणिकराव डावरे यांच्या कडून त्यांच्या प्रोफाईव्ह इंजिनिअरिंग कंपनी, कुरुळीच्या सी. एस. आर. फंडातून आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज विरगाव व जि. प. प्रा. शाळा कुंभेफळ यांना स्मार्ट क्लासरूमसाठी रुपये १,३०,०००/- किंमतीचे ७५ इंची इन्ट्रॅक्टिव्ह पॅनल भेट देण्यात आले.



आजच्या स्पर्धेच्या युगात तालुक्यातील विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शैक्षणिक ज्ञान मिळावे, या हेतूने दोन्ही संस्थांनी उद्योजक माणिकराव डावरे यांच्याकडे कंपनीच्या सी. एस. आर. फंडातून पॅनल मिळावे म्हणून मागणी केली होती. या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत उद्योजक माणिकराव डावरे यांनी दोन्ही संस्थांना प्रत्येकी एक इन्ट्रॅक्टिव्ह पॅनल संस्थांना पोहोच केले. या पूर्वीही उद्योजक माणिकराव डावरे यांनी तालुक्यातील विविध संस्था, कॉलेज, शाळा यांना अशी सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

त्यांच्या या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी दिलेल्या योगदानाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, संस्थापक सचिव डॉ. अनिल रहाणे, संस्थेचे संचालक सौ. सुप्रियाताई वाकचौरे, सौ. गीताताई रहाणे, शिवराज वाकचौरे, अक्षय रहाणे, सौ. प्रतीक्षा रहाणे, को-ऑर्डीनेटर प्रा. विद्याचंद्र सातपुते, प्राचार्या प्राजक्ता आंबरे-सावंत, सर्व प्राध्यापक, पालक व विद्यार्थी तसेच शेषनारायण डेअरीचे चेअरमन राधाकिसन कोटकर, कुंभेफळ केंद्राचे केंद्रप्रमुख बाळासाहेब आरोटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ कोटकर, संपतराव कोटकर, सुनील कोटकर, यशवंतराव पांडे, मुख्याध्यापक बाळासाहेब गिरी, शिक्षक सुरेश चव्हाण आदींसह सर्व गावकरी, पालक, शाळाप्रेमी नागरिक, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शा. व्य. स. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, सर्व विद्यार्थी, शिक्षक यांनी आनंद व्यक्त करून आभार मानले.

उद्योजक डावरे यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.








**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

**गाळे भाडेतत्वावर देणे आहे**
शोरुम, ऑफिस, बँक किंवा कमर्शिअल वापरासाठी दोन गाळे भाडे तत्वावर देणे आहे
ग्राऊंड फ्लोअर – १७०० स्क्वे. फुट
फर्स्ट फ्लोअर – १७०० स्क्वे. फुट
पत्ता – नाशिक-पुणे हायवे, डेंटल कॉलेज समोर, घुलेवाडी, ता. संगमनेर
संपर्क - 7755965616, 9422737484

**पाहिजेत**
वामनराव इथापे बी.एच.एम.एस. कॉलेजकरिता खालील पदे भरणे आहे
अकौंटंट – ०२ जागा
पात्रता – बी.कॉम/ एम. कॉम
कॉम्प्युटर ऑपरेटर – ०२ जागा, पात्रता – बी. कॉम
एल.एम. व्ही. वाहन चालक – ०३ जागा, अनुभवी
वॉचमन – ०३ जागा
पत्ता– डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड, संगमनेर
संपर्क - 9370071777
9518556933, 9822791484

**ड्रायव्हर पाहिजे**
ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा
मॅन्युअल गेअर गाडीसाठी ०१ जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
8668269897

**पतसंस्थेस कार्यालयासाठी जागा पाहिजे**
संगमनेर शहराच्या बसस्थानक, नविन नगर रोड, जाणता राजा मार्ग व मार्केट यार्ड, नाशिक रोड परिसरात पतसंस्था कार्यालयासाठी अंदाजे १ ते २ गुंठे कारपेट क्षेत्राची बांधीव किंवा प्लॉट (ओपन स्पेस) जागा मालकी तत्वावर घेणे आहे. इच्छुकांनी सात दिवसात जागेचा नकाशा, आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती व अपेक्षीत दर इत्यादी माहितीसह पतसंस्था कार्यालयाच्या पुढील पत्त्यावर सत्वर अर्ज करावेत.
संपर्क
श्री यशोदेव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, मालाणी निवास, बाजारपेठ, संगमनेर
मो. ९८२२६७६१७८, ९८२२६०८३६७

**पाहिजेत**
सरस्वती ॲग्रो इंडस्ट्रीज करीता अर्जंट भरती चालू आहे
- टेलीकॉलिंग — 10 जागा
  फ्रेशर १० ते १२ हजार पगार व अनुभवास १३ ते १५ हजार
  (कुठलीही शाखेची पदवी उत्तीर्ण व महिलांना प्राधान्य)
- प्रोडक्शन लाइन — 10 जागा
  पगार- ८ ते १० हजार (महिलांना प्राधान्य)
- Dispatch सुपरवाइझर — 02 जागा
  (कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण महिलांना प्राधान्य)
- ड्रायवर - पगार- १५ हजार — 05 जागा
  (ड्रायविंग लायसेंस व् अनुभव आवश्यक)

अर्जासह प्रत्यक्ष भेटा कॉल व भेटीची वेळ 10.00 ते 5.00
**सरस्वती ॲग्रो इंडस्ट्रीज**
संगमनेर औद्योगिक वसाहत, प्लॉट नं. 127 /A, संगमनेर, जि. अ.नगर
9699363221

**भाड्याने देणे आहे**
रुम भाड्याने देणे आहे
२०० स्के.फुट सर्व सुविधांयुक्त
पत्ता– शिवाजी नगर गल्ली, नं.१, संगमनेर
९४०४९१७९१२
९४०३१५४०१७

**पाहिजेत**
युवा ध्येय वृत्तपत्र संगमनेर कार्यालयासाठी अर्जंट पाहिजे
उपसंपादक - १
जाहिरात व्यवस्थापक - १
डिझायनर - १
वितरण व्यवस्थापक - १
टेलिकॉलर - १
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
७७६८०७९२७२, ९३७०७७३५०४

**भाड्याने देणे आहे**
सुकेवाडी रोड टच असलेला संपूर्ण कलर केलेला १२ X १२ फूट गाळा
**भाड्याने देणे आहे**
हा गाळा सलून, पार्लर, इस्त्री, टेलर, ऑफिस, नाश्ता पॉईंट किंवा गोडाऊनसाठी योग्य आहे
८२८२८२५८१८

**ड्रायव्हर पाहिजे**
गिअर आणि ऑटोमॅटिक कारसाठी अनुभवी ड्रायव्हर पाहिजे
आकर्षक पगार
श्री गुलाब आर्च
संपर्क – नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

**पाहिजेत**
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

**पाहिजेत**
श्री गणेश डिस्ट्रीब्युटर्स, विडोल ऑईल संगमनेर या फर्मसाठी
अकाउंटंट – १ जागा (बी. कॉम/ टॅली)– पुरुष
सेल्समन – १ जागा (वय वर्ष २२ ते ३२)
पगार – १४०००+ इन्सेंटिव्ह
शिक्षण – बारावी व त्यापुढील
8999862759

**पाहिजेत**
मसाज थेरपिस्ट १ जागा (पुरुष)
फिजिओथेरपिस्ट १ जागा (पुरुष)
रुग्णांचा काळजी घेणारे काका आणि मावशी
सप्तश्रृंगी हॉस्पिटल ॲण्ड पॅरालिसिस सेंटर, मुक्ताई मंदिराजवळ, रायते-वाघापूर, ता. संगमनेर, जि- अहिल्यानगर
9657230023

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६



दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर, ०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४



वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या, व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# शेतीसह ग्रामीण विकासासाठी कार्यरत युवा उद्योजक - ॲड. अमोल बोऱ्हाडे



संगमनेर तालुक्यातील एक प्रगतिशील, दूरदृष्टी असलेले आणि सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे ॲड. अमोल बोऱ्हाडे. अभियांत्रिकी व कायद्याचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी उद्योग क्षेत्रात भक्कम पाऊल टाकत एक यशस्वी उद्योजक म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे.

साईअर्पण उद्योग व अमोल डेकोर समूहाच्या माध्यमातून त्यांनी केवळ व्यवसायच नव्हे, तर समाजकारणातही उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या असून ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी ते सातत्याने कार्यरत आहेत.

साई अर्पण भारत गॅस, कळस, साई अर्पण महिंद्रा ट्रॅक्टर, अकोले, अमोल डेकोर प्रा. लि., संगमनेर आणि अमोल कुशन, संगमनेर या विविध फर्मच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण व शहरी भागात उत्कृष्ट सेवा व रोजगारनिर्मिती केली आहे. त्यांच्या उद्योगसमूहामुळे अनेक कुटुंबांना स्थैर्य व आर्थिक बळ मिळाले आहे.

शेती क्षेत्राबद्दल विशेष जिव्हाळा ठेवत त्यांनी शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रम राबवले आहेत. आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर, उत्पादनवाढ आणि शाश्वत शेती यावर त्यांनी नेहमीच भर दिला आहे. त्यांच्या प्रेरणेमुळे अनेक शेतकरी प्रगत शेतीकडे वळले आहेत.

त्यांचे लहान बंधू, संगमनेर नगरपरिषदेचे नगरसेवक भारत चंद्रभान बोऱ्हाडे हेही सामाजिक व विकासकामांमध्ये सक्रिय असून, त्यांच्या कार्यामागे ॲड. अमोल बोऱ्हाडे यांचा मोलाचा आधार व मार्गदर्शन असल्याचे प्रकर्षाने जाणवते. दोन्ही बंधूंच्या एकत्रित प्रयत्नातून समाजकारण व विकासकार्य अधिक प्रभावीपणे पुढे जात आहे.

ग्रामीण भागात मूलभूत सुविधा, रोजगाराच्या संधी आणि आधुनिक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी विविध उपक्रम यशस्वीपणे राबवले आहेत. युवक, महिला आणि उद्योजक यांना एकत्र आणून विकासाची साखळी निर्माण करण्याचे त्यांचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे.

ॲड. अमोल बोऱ्हाडे यांचे कार्य केवळ आर्थिक प्रगतीपुरते मर्यादित नसून सामाजिक जाणीव, सेवाभाव आणि नेतृत्वगुण यांचा उत्तम संगम आहे. त्यांच्या दूरदृष्टी, कार्यक्षम नेतृत्व आणि समाजाभिमुख वृत्तीमुळे ते ग्रामीण विकासासाठी झटणारे एक प्रभावी युवा उद्योजक म्हणून ओळखले जातात.

# निवडणूक आयोग हा भाजपचाच मित्रपक्ष - संजय राऊत

मुंबई (प्रतिनिधी)-

पश्चिम बंगालमधील मतमोजणीचे सुरुवातीचे कल समोर येत असून, या कलांनुसार भाजप बहुमताच्या दिशेने जाताना दिसत आहे. तर तृणमूल कॉंग्रेस पिछाडीवर पडताना दिसत आहे. या निवडणुकीच्या निकालावरून खासदार संजय राऊत यांनी भाजप आणि केंद्र सरकारवर बोचरी टीका केली आहे. ममता बॅनर्जी यांना शह देण्यासाठी निवडणूक आयोग आणि भारतीय जनता पक्ष, मोदी आणि शहा यांनी एसआयआरच्या नावाखाली जवळपास ९० लाख मते मतदार यादीतून काढली. ९० लाख मते जेव्हा एकाचवेळेला डिलीट केली जातात. त्याचा परिणाम निकालावर होतो. असा खळबळजनक आरोप राऊत यांनी केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्यावर टीका करताना राऊत म्हणाले की, निवडणुकीत तळ ठोकून राहणे हेच मोदी-शहांचे काम आहे. देशात किंवा महाराष्ट्रात मुलींवर अत्याचार होत आहेत. भ्रष्टचार होतोय, महागाई वाढलीये, नोकऱ्या नाही. यासंदर्भात ते तळ ठोकून काम करत नाहीत. पण एखाद्या राज्यात निवडणुका आल्या की, मोदी-शहांचे संपूर्ण सरकार तिथे तळ ठोकून बसते. अशी टीका संजय राऊत यांनी केली.

# महर्षि सांदिपनी गुरुकुल येथे वर्धापन दिन उत्साहात

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

महर्षी सांदीपणी गुरुकुलमध्ये दिनांक २० एप्रिल २०२६ ते ३० एप्रिल २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेले भव्य बालसंस्कार शिबिर आणि गुरुकुलचा वर्धापन दिन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. भारतीय संस्कृती, अध्यात्म, नैतिक मूल्ये आणि व्यक्तिमत्व विकास यांचा सुंदर संगम घडवून आणणाऱ्या या शिबिराने विद्यार्थ्यांमध्ये संस्कारांची अमूल्य शिदोरी रुजवली. या शिबिराचे नियोजन सांदीपणी गुरुकुलाचे अध्यक्ष मृदंग महर्षी ह.भ.प. राम महाराज पवळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. आयोजक रोहिदास महाराज बर्गे, स्वर अलंकार अनंत महाराज काळे यांच्या पुढाकारातून शिबिरामध्ये राज्यातील विविध भागांतून आलेल्या शेकडो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. दहा दिवस चाललेल्या या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान न देता भारतीय संस्कृती, संतपरंपरा आणि जीवनमूल्यांची ओळख करून देण्यात आली. विद्यार्थ्यांना योगासने, हनुमान चालीसा, हरिपाठ पाठांतर, मातृ-पितृ भक्ती, गीतापाठ, भजन, हार्मोनियम, टाळ, मृदंग व तबला वादन, आरोग्य विषयक व्यायाम, व्यसनमुक्ती, संत चरित्र, व्यक्तिमत्व विकास तसेच लाठी-काठी प्रशिक्षण अशा एकूण १४ महत्त्वपूर्ण विषयांचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले.



शिबिरातील दिनचर्या पहाटे ५ वाजता सुरू होत होती. योगासने, स्नान-संध्या, हरिपाठ, गायन व पखावज रियाज, पाठांतर, विद्यार्थी कीर्तन यांसारख्या उपक्रमांमुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय आणि उत्साहपूर्ण बनले होते. रात्री ९ वाजेपर्यंत शिस्तबद्ध पद्धतीने विविध सत्रे पार पडत होती. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शिस्त, संघभावना आणि अध्यात्मिक जाणीव निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. शिबिराच्या समारोप दिनी म्हणजेच ३० एप्रिल रोजी सायंकाळी आयोजित करण्यात आलेल्या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमात ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पखावज सोलो, तालमृदंग वादन, भजन, गायन आणि विविध सांस्कृतिक सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळालेल्या या व्यासपीठामुळे पालक आणि ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात कीर्तनकेसरी ह.भ.प. अक्रूर महाराज साखरे यांचे ओघवते आणि समाजप्रबोधनपर कीर्तन झाले. आपल्या प्रभावी वाणीमधून त्यांनी संत परंपरा, संस्कारांचे महत्त्व, व्यसनमुक्ती आणि युवकांच्या जबाबदाऱ्यांवर मार्गदर्शन केले. त्यांच्या कीर्तनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. समारोप सोहळ्यात शिक्षण, समाजसेवा, अध्यात्म आणि वारकरी संप्रदायात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मानचिन्ह, शाल आणि प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ अंतर्गत श्री. संजय किसन पानसरे (मुख्याध्यापक, शुक्लेश्वर विद्यालय, सुकेवाडी) आणि श्री. प्रेमराज सयाजी टावरे (शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा) यांचा गौरव करण्यात आला. आदर्श सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार २०२६ अंतर्गत श्री. दिपक शिवाजी बाळदे (वृक्षमित्र, नंदुरबार) आणि श्री. दिलीप वसंत गुंजाळ (संस्थापक, अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ) यांचा सन्मान करण्यात आला. आदर्श विद्यार्थी पुरस्कार (महर्षी सांदीपणी गुरुकुल) अंतर्गत ह.भ.प. शुभम महाराज बनकर आणि ह.भ.प. नवनाथ महाराज गिते यांचा गौरव करण्यात आला. आदर्श युवा कीर्तनकार पुरस्कार २०२६ अंतर्गत ह.भ.प. प्रसाद महाराज भोर (माळेगाव पठार, ता. संगमनेर) यांचा सन्मान करण्यात आला.

आदर्श ज्येष्ठ वारकरी पुरस्कार २०२६ अंतर्गत ह.भ.प. गणपत महाराज गाडेकर (नाना) यांचा गौरव करण्यात आला. या भव्य सोहळ्यास आमदार अमोलभाऊ खताळ, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, वसंत लॉन्स चे मालक गोरखशेठ कुटे, जिल्हा परिषद सदस्य सीताराम राऊत, सुभाष कुटे, विलास कुटे, प्रदीप ढमाले, ओंकार बिडवे, मच्छिन्द्र राऊत, दत्तु राऊत, अनिल राऊत, संदीप सातपुते सर, ऋतिक राऊत यांच्यासह अनेक सामाजिक, शैक्षणिक आणि वारकरी क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी गुरुकुलाच्या कार्याचे कौतुक करत अशा संस्कार शिबिरांची आजच्या काळात अत्यंत गरज असल्याचे मत व्यक्त केले. महर्षी सांदीपणी गुरुकुलने आयोजित केलेल्या या बालसंस्कार शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, अध्यात्म, शिस्त, व्यसनमुक्ती आणि व्यक्तिमत्व विकासाचे बीज रुजवण्यात यश आले आहे. आधुनिक शिक्षणासोबत संस्कारांची जोड देणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, भविष्यातही अशाच प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला.

# पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'अभिव्यक्ती' स्पर्धा उत्साहात पार

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी शैक्षणिक उपक्रमांसोबतच कला व सांस्कृतिक उपक्रमांना प्रोत्साहन देत पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेर येथे 'अभिव्यक्ती' स्पर्धेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर भाषणे, सादरीकरणे आणि कलात्मक अभिव्यक्तीद्वारे आपली प्रतिभा प्रभावीपणे मांडली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या स्वागताने व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार, प्राचार्यांचा प्रेरणादायी संदेश आणि विद्यार्थ्यांची भाषणे असा कार्यक्रमाचा क्रम पार पडला. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने सादर केलेल्या भाषणांनी आणि सर्जनशील कलाविष्कारांनी उपस्थितांची मने जिंकली.



पारितोषिक वितरण समारंभात इयत्ता ९ वी व १० वीतील अक्षिता मिश्रा (प्रथम), अनुष्का कदम (प्रथम उपविजेती), अपूर्वा नागरे (द्वितीय उपविजेती), इयत्ता ६ वी ते ८ वी या गटातील इरा दिघे (प्रथम), निती मालपाणी (प्रथम उपविजेती), स्वरा जोंधळे (द्वितीय उपविजेती), इयत्ता ३ री ते ५ वी या गटातील स्वानंद वर्पे (प्रथम), रुद्रांश कुमार (प्रथम उपविजेता), हृषीकेश खेमनार (द्वितीय उपविजेता), तसेच इयत्ता १ ली व २ रीतील साक्षी सिंग (प्रथम), अंतरीक्षा पेमगिरिकर (प्रथम उपविजेती), निव्या मेहर (द्वितीय उपविजेती) या विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला पालकांचीही उल्लेखनीय उपस्थिती लाभली.

प्राचार्या मीनाक्षी मिश्रा यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शैक्षणिक गुणवत्तेसोबतच कला व सांस्कृतिक उपक्रमांची जोड अत्यावश्यक आहे. 'अभिव्यक्ती'सारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो, आत्मविश्वास वाढतो आणि सर्जनशीलतेला चालना मिळते. उपप्राचार्य योगेश यांनी अधिक विस्तृतपणे आपले मत व्यक्त करताना सांगितले की, आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकांपुरते मर्यादित न राहता विविध क्षेत्रांमध्ये स्वतःला सिद्ध करणे गरजेचे आहे. 'अभिव्यक्ती'सारखे उपक्रम विद्यार्थ्यांना विचार मांडण्याची संधी देतात.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी कार्यक्रम समन्वयक पंकज कुटे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच उपप्राचार्य, शिक्षकवर्ग व इतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन करून उपस्थित मान्यवर, पालक आणि विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

# स्ट्रॉबेरी स्कूलच्या विद्यार्थ्यांचे अबॅकस स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर घवघवीत यश

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

१४ वी पामा इंडिया अबॅकस व मेंटल ॲरिथमेटिक राष्ट्रीय स्पर्धा २०२६ ही दि. २४ व २५ एप्रिल रोजी शिर्डी येथे यशस्वीरित्या पार पडली. देशभरातून सुमारे १५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतल्याने स्पर्धेला भव्य स्वरूप प्राप्त झाले. या प्रतिष्ठित स्पर्धेत स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूल, संगमनेर येथील ३४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेत उल्लेखनीय यश संपादन केले.

शाळेत पामा इंडिया संस्थेमार्फत राबविण्यात येणारा अबॅकस प्रशिक्षण उपक्रम अत्यंत यशस्वी ठरत असून, त्याचेच फलित विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल यशातून दिसून येते. या स्पर्धेत शाळेच्या ५ विद्यार्थ्यांनी चॅम्पियनशिप, १४ विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक, ११ विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक, तर ४ विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली. या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे तसेच मार्गदर्शक शिक्षक सोनाली पठाडे व वर्षा पुंड यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



















आपल्या व्यावसयाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यावसयाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०






# देशमुख - चिलप परिवाराचा शाही विवाह सोहळा आणि नेत्यांची मांदियाळी




छाया – प्रसाद सुतार, संगमनेर




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर – महाराष्ट्रातील ख्यातनाम समाजप्रबोधनकार व कीर्तनकार निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांची कन्या ज्ञानेश्वरी आणि प्रसिद्ध उद्योजक सुनील चिलप यांचे सुपुत्र साहिल यांचा शाही विवाह सोहळा रविवारी संगमनेरात पार पडला. या सोहळ्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राज्यस्थानचे राज्यपाल हरीभाऊ बागडे, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खा. भाऊसाहेब वाकचौरे, आ. शरद सोनवणे, आ. विठ्ठलराव लंघे, आ. डॉ. किरण लहामटे, माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील, आ. विवेक कोल्हे, आ. सत्यजीत तांबे, आ. अमोल खताळ, खा. राजन विचारे, खा. राजाभाऊ वाझे , आ.श्वेता महाले, जिल्हा परिषद माजी अध्यक्षा शालिनी विखे पाटील, उद्योजक राजेश मालपाणी, बाळासाहेब थोरात यांच्या कन्या जयश्री थोरात यांच्यासह राज्यातील अनेक दिग्गज नेते, आजी – माजी मंत्री, उद्योजक व आध्यात्मिक क्षेत्रातील अनेक साधु, संत, किर्तनकार मान्यवरांची उपस्थिती लाभली. राज्याचे प्रमुख नेते संगमनेरात आल्याने नुतन जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

इंदोरीकर महाराजांच्या कन्येच्या विवाह सोहळ्याची राज्यभरात मोठी चर्चा सुरू असून, हा ऐतिहासिक व देखणा सोहळा प्रत्यक्ष पाहण्यासाठी संगमनेरासह आसपासच्या जिल्ह्यांमधून हजारो नागरिक या विवाह सोहळ्यासाठी उपस्थित होते.



छाया – प्रसाद सुतार, संगमनेर

